UPLOADED ON
sic.maharashtra.gov.in

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अन्वये दाखल झालेले तक्रार क्रमांक २०६/२०१६**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर,
प्रशासकिय इमारत क्र.२, सिव्हील लाईस,
नागपूर-४४० ००१.

श्री. शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा,
प्रभात नगर, भौसा रोड, राजु किराण्याजवळ,
यवतमाळ, जि. यवतमाळ

**तक्रारकर्ता**

**विरूध्द**

जन माहिती अधिकारी तथा पुरवठा विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

**उत्तरवादी**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा
अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दि. २७.०६.२०१६)**

तक्रारकर्ता यांनी मा. राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर यांचेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीची सुनावणी दि. २७.०६.२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारकर्ता उपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ श्री. एम.एम. पदवाड व प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ श्री. आर.एल. काळे हे उपस्थित आहेत.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
नागपूर

तक्रारकर्ता यांचे आयोगाकडील अपील क्र. ३५३४/२०१४ मध्ये आयोगाने दिनांक ३०.१०.२०१५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार तक्रारकर्ता यांचे अपील मंजूर करुन सदर अपिल निकाली काढण्यात आली होती.

"माहिती आयोगाचे आदेशाची अंमलबजावणी झाली नाही", असे कारण नमूद करुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०५.०५.२०१६ रोजी आयोगाकडे कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केलेला दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, माझ्या द्वितीय अपिल क्रमांक ३५३४/२०१४ मध्ये मा. आयोगाचे आदेश पारित दिनांक ३०.१०.२०१५ ची अंमलबजावणी झालेली नसुन मला अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही. करीता मी सदर तक्रार अर्ज केलेला आहे.

सदर तक्रारीवर आयोगासमक्ष झालेल्या सुनावणी दरम्यान असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ११.०२.२०१४ रोजीच्या माहिती अर्जान्वये, मनोज पसारी यांनी सादर केलेले राजीनामे व मा. अप्पर जिल्हाधिकारी यांनी संबंधीत नॉमीनीचे ४०% टक्के अनामत रक्कम व शासन जमा केली त्याबाबत व संबंधीत नॉमीनी व जि.पू.अ यांच्या झालेल्या सर्व पत्रव्यवहार यांच्या नोटीशीसह संपूर्ण नस्तीच्या प्रती व इतर३ मुद्दयाची माहिती मागितलेली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान स्पष्ट झाले की, अपिलार्थीस परिपूर्ण माहिती मिळाली नाही. यामूळे सदर तक्रार मान्य करण्यात येते.

सदर प्रकरणी ७(१) व १९ (६) चा भंग झाला असून वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१) व १९ (६) चा किंवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तीची नावे दि.०४.०८.२०१६ पर्यंत निश्चित करुन त्यांना हा आदेश बजवावा व त्यांची पोच जतन करावी व

त्यांच्याकडून खुलासा प्राप्त करावा सदर खुलासा त्यांनी आयोगासमोर सादर करावा अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींनुसार शास्तीस पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

वरील विवेचनानुसार तक्रार निकाली काढण्यात येते.

**(वसंत द. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ, नागपूर**

---

(तक्रार क्र. २०६/२०१६)

जावक क्र.------------ दि.---------
5622 12 AUG 2016

राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर

निर्गमित केले
12 AUG 2016

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
नागपूर

**उपसचिवांच्या स्वाक्षरीनिशी निर्गमीत**

उपसचिव,
राज्य माहिती आयोग,
नागपूर खंडपीठ

(तक्रार क्र. २०६/२०१६, 3/3)